ARTHA Poona 4.

अर्थशास्त्र, व्यापार, उद्योगधंदे, बँकिंग, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें एकमेव मराठी साप्ताहिक

स्थापना : १९३५

# अर्थ

" अर्थ एव प्रधानः " इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक बुधवारीं प्रसिद्ध होतें.
वर्गणीचे दर :
वार्षिक : ६ रु.
सहामाही : ३ रु.
किरकोळ : २ आ.
दुर्गाधिवास, पुणें ४.

LICENCED TO POST WITHOUT PREPAYMENT
Reg. No. B. 3434. Licence No. 53.

वर्ष २२ | पुणें, बुधवार तारीख २० जून, १९५६ | अंक २५

## विविध माहिती

**मदुरा शहरांत पाण्याचें दुर्भिक्ष**—मदुरा शहरांत पाण्याचें दुर्भिक्ष फार जाणवूं लागलें आहे. गेल्या पंचवीस वर्षांत पाण्याची इतकी टंचाई भासली नव्हती. शहराला पाणीपुरवठा करण्यासाठी नदींत बांधण्यांत आलेल्या विहिरींचें पाणी ह्या वर्षी खूपच खालावलें आहे. दर वर्षी ह्या सुमारास विहिरींत १० फूट पाणी असतें. यंदां तें अवघें ३॥ फूट आहे. शहराची लोकवस्ती ४ लाख असून त्याला रोज ३५ लाख गॅलन पाणी लागतें.

**बँकॉकचें व्यापारी प्रदर्शन**—बँकॉक येथें येत्या डिसेंबर महिन्यांत एक आंतरराष्ट्रीय प्रदर्शन भरविण्यांत येत आहे. प्रदर्शनांत ३५ देश भाग घेणार असून भारतालाहि भाग घेण्याबद्दल आवाहन करण्यांत आलें आहे. सयाममध्यें १९३२ सालीं सनदशीर राजसत्ता स्थापन झाली. ह्या घटनात्मक प्रसंगाच्या स्मरणार्थ हें प्रदर्शन दरवर्षी भरविण्यांत येत असतें.

**सिगारेटचा कारखाना**—आंध्र राज्यांत सिगारेटचा कारखाना काढण्याचें राज्य सरकारनें ठरविलें आहे. ह्या कामीं भारतीय सरकार राज्य सरकारला आर्थिक मदत देणार आहे. कारखाना उभारण्यासाठी जितकें भांडवल लागेल, त्याच्या निमपटीनें भांडवल कारखाना काढणाऱ्यांनीं उभारलें पाहिजे अशी अट आर्थिक मदतीसंबंधीं घालण्यांत आली आहे.

**तेलाच्या धंद्यांतील तंत्रज्ञ**—तेलाच्या उत्पादनासाठी लागणाऱ्या तंत्रज्ञांचा एक संघ परदेशांत शिक्षण घेण्यासाठी पाठविण्यांत येणार असल्याची माहिती भारतीय सरकारच्या नैसर्गिक साधनसंपत्ति खात्याचे मंत्री, श्री. मालवीय ह्यांनीं दिली आहे. हा संघ रशिआ, पश्चिम जर्मनी, रुमेनिआ व अमेरिका ह्या देशांतून शिक्षण घेईल.

**सौराष्ट्रांत सायकलींचा कारखाना**—सौराष्ट्रांत भावनगर ह्या शहरांत सायकलींचा कारखाना काढण्याची योजना कांहीं उद्योगपतींनीं सौराष्ट्र सरकारला सादर केली आहे. ह्या कामीं एका जर्मन कंपनीचें सहकार्य मिळविण्यांत येणार आहे. कारखाना उभारण्यासाठी १ कोटी रुपयांचें भांडवल लागेल. जरूर तितका विजेचा पुरवठा होऊं शकेल किंवा नाहीं ह्याची तपासणी करण्यांत येत आहे.

**पाकिस्तानकडून सिमेंटचा पुरवठा**—पाकिस्तान सरकारनें आपल्याजवळ शिल्लक असलेल्या साठ्यापैकीं ६०,००० टन सिमेंट भारताला विकण्याची तयारी दाखविली आहे. भारताच्या निरनिराळ्या भागांत सध्यां सिमेंटची टंचाई आहे. ब्रह्मदेश व रशिया ह्या देशांनींहि भारताला सिमेंट पुरविण्याची तयारी दाखविली आहे.

**जपानकडून पोलादाची आयात**—जपानकडून ५ लाख टन पोलाद आयात करण्याचा भारतीय सरकारचा विचार आहे. जपानच्या पोलादाच्या धंद्याचे प्रतिनिधी वाटाघाटींसाठी सध्यां भारतांत आले आहेत. अर्जेंटायना जपानकडून पूर्वीइतकें पोलाद घेत नसल्यामुळें जपान नव्या गिऱ्हाइकांच्या शोधांत असल्याचें समजतें. दुसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमांतील कामांना पोलादाचा पुरवठा करण्यासाठी भारतानें अनेक देशांशीं करार केलेले आहेत.

**क्षयरोगासारखा नवा रोग**—अमेरिकेंत क्षयरोगाच्या लक्षणांनीं युक्त पण क्षयरोग नसलेल्या अशा एका नव्या रोगाचा प्रादुर्भाव झाला आहे. क्षयरोगाचे विशेषज्ञ डॉक्टर्स नव्या रोगाचा अभ्यास करीत आहेत. तरुण माणसांना ह्या रोगाची बाधा कमी होते. पण ती झाल्यावर क्षयरोगावरील उपचारपद्धतीचा उपयोग होत नाहीं.

**अंबर चरख्यासाठी ७० लाख रु.**—अंबर चरख्याचा प्रसार करण्यासाठी भारतीय सरकारनें १९५६–५७ सालांत ७० लाख रुपये खर्च करण्याचें ठरविलें आहे. १०,००० अंबर चरखे तयार करण्याचा कार्यक्रम आंखण्यांत आला आहे. चरख्याचा उपयोग शिकविण्यासाठी १५ केंद्रें स्थापन करण्यांत येणार आहे. ह्या केंद्रांतून ७५० विद्यार्थ्यांना ६ महिनेपर्यंत शिक्षण देण्यांत येईल. त्यांना दरमहा ६० रुपये मिळतील.

**शहरांतील गलिच्छ वस्त्या**—भारतामधील मोठ्या शहरांतून असलेल्या गलिच्छ वस्त्या नाहींशा करण्याची योजना मध्यवर्ती सरकारनें राज्य सरकारांना सुचविली आहे. वस्त्या नाहींशा करण्यासाठी जो खर्च येईल त्याच्या २५ टक्के खर्च अगर ५० टक्के रकम कर्ज म्हणून देण्याची तयारी दाखविण्यांत आली आहे. वस्त्या हलवतांना तेथील रहिवाशांची दुसरीकडे सोय करावयाची आहे.

**म्हैसूर राज्यांतील विमाखातें**—म्हैसूर सरकारचें विमाखातें राज्यांत विम्याच्या ५ कचेऱ्या काढण्याचा विचार करीत आहे. म्हैसूर राज्यांत औद्योगिक व व्यापारी बाबतींत चांगली प्रगति होत असल्यानें ह्या संकल्पित कचेऱ्यांच्या मार्फत बराच नवा धंदा मिळवितां येईल असा अंदाज आहे.

**कीड-मुंगी नष्ट करणारें रसायन**—कराची विद्यापीठांतील संशोधकांनीं कोळशापासून डी. डी. टी. सारखेंच एक रसायन तयार केलें आहे. नवीन रसायन मोठ्या प्रमाणावर तयार करण्यासाठी एक कारखानाहि काढण्यांत येत आहे. रसायन डी. डी. टी. सारखेंच उपयुक्त असल्याचें सिद्ध झालें आहे.

**तेलाच्या विहिरींची यंत्रसामुग्री**—भारतीय सरकारनें रशिआकडून तेलाच्या विहिरी चालविण्यासाठी आतांपर्यंत १,३४,००,००० रुपयांची यंत्रसामुग्री खरेदी करण्याचा करार केला आहे. ह्या किंमतींत तीन विहिरी चालविता येतील, इतकी सामग्री भारताला मिळणार आहे. विहिरी खोदून त्या चालविण्यासाठी रशिअन तज्ज्ञ भारतांत येणार आहेत. भारतीय तंत्रज्ञ शिकून तयार करण्याचेंहि ठरलें आहे.

**ब्रिटनला होणारी कापडाची निर्यात**—ब्रिटिश पार्लमेंटमध्यें एका मजूर सभासदानें भारतांतून ब्रिटनला आयात करण्यांत येणाऱ्या कापडावर बंधनें घालावीं अशी सूचना केली असतां ब्रिटनच्या बोर्ड ऑफ ट्रेडचे अध्यक्ष मि. थॉर्निक्रॉफ्ट ह्यांनीं ती अमान्य केली. अमेरिकेनें आपल्या कापडाच्या उत्पादनाच्या दीड टक्काच कापड जपानकडून आयात करण्याचें धोरण अवलंबिलें आहे. त्याच धर्तीवर निर्बंध घालण्याची सूचना मजूर सभासदानें केली होती.

**नवीन जातीचा गहूं**—इंडिअन ॲग्रिकल्चरल रिसर्च इन्स्टिटयूटनें गव्हाची एक नवीन जात शोधून काढली आहे. उत्तर हिंदुस्थानांत ज्या प्रकारचा गहूं पिकविला जातो त्यापेक्षा हा गहूं पंधरा दिवस लवकर तयार होतो. सकस जमिनींत नवा गहूं चांगला येईल असें मत व्यक्त करण्यांत आलें आहे. दिल्ली आणि राजस्थान भागांत त्याची लागवड यशस्वी रीत्या करण्यांत आली आहे.

**यांत्रिक पद्धतीची शेती**—भारतीय सरकारनें शेतीच्या यांत्रिक अवजारांचा उपयोग करणारी एक मोठी शेतवाडी रशिअन तज्ज्ञांच्या मदतीनें स्थापन करण्याचें ठरविलें होतें. मध्यप्रदेश सरकारनें शेतीसाठी बस्तर जिल्ह्यांतील ५० मैलांचा टापू सुचविला होता. पण रशिअनांच्या मतानें हा टापू सोयीस्कर नाहीं. अशा प्रकारच्या शेतीला २६,००० एकर तरी सलग जमीन लागेल. राजस्थानांत हा प्रयोग अधिक यशस्वितेनें करतां येईल, असें त्यांचें मत आहे.

**फर्ग्युसन ट्रॅक्टर्सची निर्मिति**—ब्रिटिश बनावटीच्या फर्ग्युसन ट्रॅक्टर्सचें उत्पादन भारतांत सुरू करण्यांत येणार आहे. ब्रिटिश कारखान्याचे चालक आणि भारतीय सरकारचें व्यापार व उद्योगखातें ह्यांच्यांत तत्संबंधीं करार करण्यांत येणार आहे. स्टॅंडर्ड मोटार प्रॉडक्टस् हा मद्रासमधील कारखाना हे ट्रॅक्टर्स तयार करणार आहे. १९४९ पासून अशा प्रकारचे १०,००० ट्रॅक्टर्स भारतांत आयात करण्यांत आले आहेत.

**ब्रिटिश कंपनी विकत घेण्याची तयारी**—त्रिनिदाद ऑईल कंपनी ही ब्रिटिश मालकीची तेलाची कंपनी विकत घेण्याची तयारी अमेरिकन टेक्सास कंपनीगटानें दाखविली आहे. ब्रिटिश कंपनीचें भांडवल ३ कोटी पौंडांचें आहे. अमेरिकन कंपनीनें ६·३ कोटी पौंड देऊं केले आहेत. कंपनी विकण्यांत आली तर तिच्या भागीदारांना त्यांच्या भागाच्या सध्याच्या किंमतीच्या दुप्पट किंमत मिळेल.


## DECCAN INSTITUTE OF COMMERCE

**594, Budhawar Peth, Poona 2.**

Opens for the 1956–57 session on Thursday the 21st June 1956. Students coached up for G. C. D., L. C. C., D. Com., C. A. (Preliminary)., G. D. C. & A., C. A. I. I. B, A. C. M. A., Shorthand, Typewriting. Morning and Evening Classes.

Admission to respective Diploma Courses open to Matriculates, Under-graduates and Graduates.

Prospectus free on application to the Secretary.

५० वर्षांपेक्षा जास्त जनतेची सेवा करीत असलेलें मुंबईतील एक प्रसिद्ध निवासस्थान

प्रत्येक खोलींत स्वतंत्र बाथरूम व बाल्कनी

लग्नमुंजी वगैरे कार्यांची व भोजनपार्टीची कमी खर्चांत मनपसंत व्यवस्था

सभासंमेलनें यांची टिळक हॉलमध्यें सोय.

क्रॉफर्ड मार्केटजवळ, मुंबई २.

दि
प्रेसिडेन्सी इंडस्ट्रियल
बँक लि.
( शिड्यूल्ड बँक )
प्रेसिडेन्सी बँक बिल्डिंग
पुणे २. ( टे. नं. २७६३ )

अधिकृत, विक्रीस काढलेलें
व खपलेलें भांडवल रु. १०,००,०००
जमा झालेलें भांडवल रु. ७,२४,९१०
खेळतें भांडवल रु. ७५,००,०००

मुंबई शाखाः—कॉमनवेल्थ बिल्डिंग,
८२, मेडोज स्ट्रीट, मुंबई १:

श्री. ग. रा. साठे, अध्यक्ष. श्री. वा. ग. बापट, उपाध्यक्ष.

बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

श्री. गो. धों. जोगळेकर, बी. ए. (ऑ.), बी. कॉम., एलएल. बी., मॅनेजर.
श्री. सी. टी. खिवळे, मॅनेजिंग डायरेक्टर. टे. नं. २६०७

# अर्थ

बुधवार, ता. २० जून, १९५६



संस्थापक :
प्रो. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे


## जागतिक बँकेकडून देण्यांत येणारीं कर्जें

जागतिक बँकेचे अध्यक्ष मि. युजीन ब्लॅक ह्यांनीं असा अंदाज केला आहे कीं पुढील तीन महिन्यांत बँकेकडून ४५ कोटी डॉलर्सचीं कर्जें मंजूर करण्यांत येतील. रुपयाच्या चलनांत कर्जाची रक्कम सुमारें २१४ कोटी रुपये होईल. भारताचें पोलादाचें उत्पादन वाढविण्यासाठी एक कर्ज बँक देणार आहे. तें वरील ४५ कोटी रकमेच्या कर्जांत धरलेलें आहे. मि. युजीन ब्लॅक हे वृत्तपत्रकारांना बँकेच्या पुढील कार्यक्रमाची माहिती देत होते. चालू महिन्याच्या अखेरीपर्यंत बँक २० कोटी डॉलर्सचीं पांच कर्जें मंजूर करील. ह्यापैकीं सर्वांत मोठें कर्ज ८ कोटी डॉलर्सचें असून तें फेडरेशन ऑफ ऱ्होडेशिया अँड न्यासालँडच्या सरकारला देण्यांत येणार आहे. फेडरेशननें पाण्याच्या प्रवाहाच्या साह्यानें वीज उत्पन्न करण्याची एक योजना आखली आहे. ही योजना पूर्ण करण्यासाठीं एकूण २५ कोटी डॉलर्स खर्च येणार आहे. ह्या कर्जाच्या खालोखाल दुसरें मोठें कर्ज ७.५ कोटी डॉलर्सचें म्हणजे सुमारे ३६ कोटी रुपयांचें असून तें टाटा कंपनीला पोलादाचें उत्पादन वाढविण्यासाठी देण्यांत येणार आहे. कर्जाचा उपयोग करून टाटा पोलादाच्या कारखान्याचें उत्पादन सध्यांच्या दुप्पट करण्यांत येईल. ऑस्ट्रिआ ह्या देशाला दोन कर्जें मंजूर करण्यांत येणार आहेत. ऑस्ट्रिआंतील वीज-निर्मिती-केंद्रांची पुनर्घटना करण्यासाठी त्यांचा उपयोग करण्यांत येईल. कोलंबिआ ह्या देशांतील राजरस्ते बांधण्यासाठींहि बँकेकडून कर्ज देण्यांत येणार आहे. ३० जून, १९५५ अखेर पुऱ्या होणाऱ्या आर्थिक वर्षांत बँक एकूण ४५ कोटी डॉलर्सचीं कर्जें निरनिराळ्या देशांना देईल. चालू वर्षीं अमेरिकेच्या भांडवल बाजारांत बँक आपले बाँड विकणार आहे. मि. युजीन ब्लॅक हे सध्यां इराण, सौदे अरेबिआ, इजिप्त, इत्यादि देशांच्या दौऱ्यावर आहेत.

## साखर कारखान्यांना लागणारी यंत्रसामुग्री

दुसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमाच्या अवधींत भारतांत साखरेचे बरेच नवे कारखाने काढण्यांत येणार आहेत. सुमारें ३० तरी नवे कारखाने स्थापन करण्यांत येतील अशी अपेक्षा आहे. हल्लीं साखरेचें वार्षिक उत्पादन १६–१७ लाख टनांपर्यंत आहे. तें दुसऱ्या योजनेच्या अखेरपर्यंत २२ लाख टनांपर्यंत वाढविण्याचें ठरविण्यांत आलें आहे. तथापि, नव्या कारखान्यांना लागणारी यंत्रसामुग्री व चालू कारखान्यांना लागणारे सुटे भाग भारतांत तयार होत नाहींत. ही सर्वच यंत्रसामुग्री सध्यां परदेशांतून आयात करावी लागते. उसापासून साखर तयार करण्याची संपूर्ण यंत्रसामुग्री भारतांतच तयार करतां यावी असा भारतीय सरकारचा मानस होता. त्याला अनुसरून यंत्रसामुग्री बनविणाऱ्या चार कंपन्यांकडून आलेल्या योजना सरकारनें मंजूर केल्या आहेत. ह्या चारी कंपन्यांना परदेशी कंपन्यांचें सहकार्य लाभलेलें आहे. झेकोस्लोव्हाकिआ, पश्चिम जर्मनी, हॉलंड व स्कॉटलंड येथील कारखानदार भारतीय कंपन्यांना साह्य करणार आहेत. प्रत्येक भारतीय कंपनी दरसाल दोन साखर कारखान्यांना लागणारी संपूर्ण यंत्रसामुग्री तयार करूं शकेल. मुंबईमधील प्रोटास एंजिनिअरिंग कंपनी पहिल्या प्रथम साखरेच्या कारखान्यांची यंत्रसामुग्री निर्माण करूं लागेल. तथापि, बाकीच्या तीन कंपन्याहि लवकरच प्रत्यक्ष उत्पादनास प्रारंभ करतील व १९६१ च्या सुमारास सर्वच कारखाने जास्तींत जास्त निर्मिति करूं लागतील असा अंदाज आहे. सर्व कारखाने पूर्णपणें चालू झाले कीं दरसाल ८ साखरेच्या कारखान्यांना लागणारी यंत्रसामुग्री व जरूर ते सुटे भाग तयार होऊं लागतील.

## मच्छीमारीच्या धंद्याची सुधारणा

भारतीय सरकारनें मच्छिमारीच्या धंद्याचा विकास व सुधारणा करण्याची योजना तयार केली आहे. ह्या योजनेप्रमाणें पुढील १० वर्षांत भारतांत हल्लींपेक्षा ५० टक्के अधिक मासे पकडण्याची व्यवस्था होईल. मच्छीमारीच्या धंद्यामुळें भारताच्या राष्ट्रीय उत्पन्नांत दरसाल २७ कोटी रुपयांची भर पडते. निरनिराळ्या प्रकारच्या ७५,००० बोटी ह्या व्यवसायांत गुंतलेल्या असून त्या भारताच्या ३,००० मैल लांबीच्या किनाऱ्यावर पसरलेल्या आहेत. सुमारें ७,५०,००० कोळी आपली उपजीविका मच्छीमारीच्या साह्यानें करीत आहेत. तथापि, धंद्याच्या तंत्रांत सुधारणा करणें आणि त्यासंबंधीं अधिक संशोधन करणें ह्या गोष्टीहि महत्त्वाच्या आहेत. दुसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमांत मच्छीमारीच्या धंद्याच्या विकासासाठी १२ कोटी रुपयांची तरतूद करण्यांत आली आहे. पहिल्या पंचवार्षिक कार्यक्रमाच्या आरंभीं भारतांत दरसाल सुमारें १० लाख मेट्रिक टन मासे पकडले जात असत. मच्छीमारीच्या पद्धतींत तांत्रिक सुधारणा करण्याचें कांहीं कार्य पहिल्या पंचवार्षिक कार्यक्रमांत करण्यांत आलें. त्यामुळें माशांच्या उत्पादनांत १० टक्के वाढ झाल्याचें दिसून आलें. दुसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमांत ज्या सुधारणा करण्यांत येतील त्यांच्या योगानें उत्पादन २३ टक्के वाढेल असा अंदाज करण्यात आला आहे. पहिल्या पंचवार्षिक कार्यक्रमांत ह्या धंद्यासाठी ५ कोटी रुपयांची सोय करण्यांत आली होती. मासे पकडण्याच्या पद्धतींत सुधारणा करणें, नवीन जलाशयांत माशांची पैदास सुरू करणें, माशांचा सांठा करण्याची व वाहतूक करण्याची व्यवस्था करणें, त्यांच्या विक्रीची संघटना करणें, इत्यादि कामें पहिल्या कार्यक्रमांत पार पाडण्यांत आलीं.

## अर्थव्यवस्थेंतील खाजगी विभाग

मध्यवर्ती सरकारचे नैसर्गिक साधन-संपत्ति खात्याचे मंत्री श्री. के. डी. मालवीय म्हैसूरला गेले होते. म्हैसूरच्या खाणी मालकांच्या संघटनेनें त्यांना दिलेल्या मेजवानीच्या प्रसंगीं, श्री. मालवीय म्हणाले कीं, औद्योगिक विकासाच्या क्षेत्रांतून खाजगी मालकीच्या उद्योगधंद्यांना हुसकून लावण्याचा सरकारचा विचार नाहीं. ह्या कामांत खाजगी मालकीचे धंदे आणि सार्वजनिक मालकीचे धंदे ह्यांच्यांत वाटणी करावी, एवढेंच सरकारचें

धोरण आहे. प्रमुख उद्योगधंद्यांतील उत्पादनावर नियंत्रण ठेवावें असें सरकारचें धोरण आहे, ही गोष्ट खरी. पण त्याचा अर्थ खाजगी मालकीच्या उद्योगधंद्यांचा तेजोभंग करावयाचा सरकारचा इरादा आहे, असें मात्र नाहीं. खाजगी उद्योगधंद्यांत जो पैसा गुंतविला जातो आणि जें लक्ष दिलें जातें त्यांचा योग्य उपयोग होतो कीं नाहीं हें काळजीपूर्वक पहाण्याची तरतूद सरकारनें केली आहे. भारतीय सरकारनें आपलें औद्योगिक धोरण नुकतेंच जाहीर केलेलें आहे. पण खाणी मालकांनीं घाबरून जाण्यासारखें त्यांत कांहींच नाहीं. आपल्यावर कांहीं मोठें संकट कोसळलें आहे अशी जी समजूत खाणी मालकांनीं करून घेतली आहे ती चुकीची आहे, ह्याची त्यांना हळुहळु खात्री होईल. आपल्या देशांतून दारिद्र्य आणि अज्ञान खणून काढण्याविषयीं पं. नेहरूंनीं चंग बांधला आहे. सरकारचाहि तोच विचार आहे. हें साध्य साधण्यासाठीं उत्पादनाचीं व वाटपाचीं साधनें नियंत्रित करण्याचें ठरविण्यांत आलें आहे. ह्या कामांत आपणांस केव्हां यश येईल हें काळच सांगूं शकेल. त्याचप्रमाणें, कोणत्या मार्गांनीं तें उत्तम रीतीनें साधतां येईल, हेंहि भविष्यांत दडलेलें आहे.

## बृहन्महाराष्ट्र शुगर सिंडिकेटच्या लि. संचालक मंडळाचें नम्र निवेदन

आपल्या सिंडिकेटचे अत्यंत कर्तबगार मॅनेजिंग एजण्ट श्री. चंद्रशेखर गोविंद आगाशे यांच्या आकस्मिक निधनाची वार्ता सिंडिकेटच्या भागीदार व ठेवीदार यांच्या वाचनांत आलेली आहेच. श्री. आगाशे यांच्यावर महाराष्ट्रीय जनतेचें प्रेम व विश्वास होता यांत संशय नाहीं. त्यांच्या सक्रिय सहकार्यामुळेंच हा कारखाना पूर्णपणें यशस्वी झाला. यापुढेंहि ठेवीदार व भागीदार यांनीं संचालक मंडळास पूर्ववत् सहकार्य द्यावें अशी विनंती आहे. भविष्यकाळांत या कारखान्याचें भवितव्य उज्ज्वल असल्यामुळें कारखान्याचे ठेवीदार व भागीदार यांना काळजीचें मुळींच कारण नाहीं.

श्री. आगाशे यांनीं घालून दिलेला उपक्रम आम्हीं त्यांच्याच स्फूर्तीमुळें पुढें चालविण्याचा निश्चय केलेला आहे. भागीदार व ठेवीदार यांचे हितसंबंध पूर्णपणें सुरक्षित ठेवून आम्ही कारखान्याची आणखीहि भरभराट करण्याकडे लक्ष देत आहोंत. तरी कंपनीचे भागीदार व ठेवीदार यांनीं या महाराष्ट्रीय मध्यमवर्गीयांच्या कारखान्यावर पूर्ववत् प्रेम व निष्ठा ठेवावी व मदत करावी अशी आमची त्यांना सविनय प्रार्थना आहे. सिंडिकेटच्या भागीदारांना व ठेवीदारांना कांहीं माहिती पाहिजे असल्यास संचालक मंडळ ती आनंदानें देईल व त्यांच्या अडचणींचें निवारण करील.

या प्रसंगीं आम्हीं नम्रपणें महाराष्ट्रीय जनतेस प्रेमभावानें विनंती करितों कीं, कोणाचे जुने मतभेद असल्यास त्यांनीं ते थोर मन करून विसरून जावें आणि सिंडिकेटच्या भरभराटीच्या कार्मीं त्यांनींहि हातभार लावावा. मध्यमवर्गीय महाराष्ट्रीयांचा हा साखर कारखाना त्यांनाच चालवितां यावा आणि या कारखान्याचें उदाहरण महाराष्ट्रीय जनतेस आदर्शभूत व स्फूर्तिदायक राहण्यास सर्वांनीं अंतःकरणपूर्वक मदत करावी, अशी प्रार्थना करून आम्हीं हें निवेदन पुरें करीत आहोंत.

आपले नम्र संचालक,

जगन्नाथ महाराज पंडित, (चेअरमन) नीलकंठ चिंतामण लिमये, अनंत गुंडो गोखले, अण्णाजी पांडुरंग कोंडे देशमुख, रघुनाथ गणेश ठकार, गणेश राजाराम वाळिंबे, शंकरराव भगवंतराव कोंडे देशमुख, भगवान गणेश भाडुले, शंकर लक्ष्मण लिमये.


## कण आणि क्षण

(दुसरी मराठी आवृत्ति)

## સુખી જીવનની પગદંડી

(બીજી ગુજરાતી આવૃત્તિ)

लेखक :—श्री. वा. काळे, संपादक, "अर्थ"

This collection of thirty essays by the Editor of *Artha* originally appeared in Marathi in *Bhagini*, a monthly for ladies. Their theme is how little trifles is speech, behaviour and thought matter in personal and social life, and may and do mount into untold happiness. Written in a simple, easy, persuasive style, these essays are full of illustrative anecdotes drawn from present day life. In the context of changing currents of life and the economic impact thereof, a special importance belongs to the art an individual is here exhorted to learn to manage his personal life happily and to add to the total happiness of the community. Their appeal is rational and outlook positivist, both human and humane. The value of the book has been explained at length in a foreword by the late Mr. G. V. Mavalankar.

*The Times of India*
10th June, 1956.


**पाकिस्तानला रशिआची मदत**—पाकिस्तान व रशिया ह्यांच्या दरम्यान व्यापारी देवघेवीचा करार करण्यासंबंधी वाटाघाटी चालू आहेत. देवघेवीच्या व्यवहारांतील पैशाच्या देण्याघेण्यासंबंधींहि उभयतां देशांचे प्रतिनिधी विचार करीत आहेत. हे दोन्ही करार स्वतंत्र असतील. ह्याशिवाय पाकिस्तानला रशिया कोणत्या स्वरूपाची आर्थिक मदत देऊं शकेल, ह्यासंबंधींहि चर्चा होण्याचा संभव आहे.

**मुंबईंतील गोद्यांची सुधारणा**—भारतीय सरकारनें मुंबई बंदरांतील प्रिन्सेस गोदी व व्हिक्टोरिया गोदी ह्यांची सुधारणा करून त्या अद्यावत् बनविण्याचें ठरविलें आहे. ह्या कामासाठी जी किमान योजना आंखण्यांत आली आहे ती पूर्ण करण्यासाठी पोर्ट ट्रस्टला ९ कोटी रुपये खर्च येईल. योजनेसाठी ५ कोटी रुपये खर्च येईल असा अंदाज प्रथम करण्यांत आला होता.

**युरोपच्या सफरींना बंदी**—इजिप्तच्या सरकारनें आपल्या नागरिकांना युरोपीय देशांत सफरी काढण्यास बंदी केली आहे. ही बंदी अरब राष्ट्रांना मात्र लागू नाहीं. इजिप्तला परदेशीय चलनांची फार गरज असल्यामुळें सफरीसारख्या चैनीवर खर्च करणें गैर आहे असें सरकारचें मत आहे. ह्यापुढें फक्त असाध्य रोग झालेल्यांनाच उपचारासाठी रोमला जातां येईल.

**घरांच्या तुटवड्याचा प्रश्न**—भारताचे मजूरमंत्री श्री. खंडुभाई देसाई राजकोट येथें बोलतांना म्हणाले कीं, रहात्या घरांच्या तुटवड्याचा प्रश्न सोडविण्यासाठी सहकारी संस्थांच्या मार्गानें जोराचे प्रयत्न केल्यास तो १० ते १५ वर्षांच्या काळांत सुटूं शकेल. घरें बांधण्याच्या सहकारी प्रयत्नांना भारतीय सरकार उत्तेजन व मदत देण्यास सदैव तयार आहे.

**रशिअन अर्थव्यवस्थेसंबंधीं माहिती**—रशिअन सरकारनें आपल्या अर्थव्यवस्थेविषयीं आंकडेवार माहिती देणारें ३६२ पानांचें पुस्तक विक्रीस ठेवलें आहे. ह्यापूर्वी अशा प्रकारची माहिती गुप्त राखण्यांत येत असे.

## घर तारणावर कर्जे देणारी स्वतंत्र सहकारी बँक

### घटनेचा आराखडा

( श्री. मो. वि. रबडे, श्री. व्ही. पी. कान्हेरे व श्री. व्ही. व्ही. शहाडे ह्यांनीं पुढाकार घेऊन, वरील संस्थेच्या स्थापनेची पूर्वतयारी केली. त्यासाठी एक सभा भरवून, संस्थेची घटना तयार करण्यासाठी तीन एक समिति नेमण्यांत आली. त्या समितीनें खालीलप्रमाणें घटनेचा खर्डा तयार केला आहे. त्यावर सध्यां विचारविनिमय चालू आहे. )

१. बँकेचें नांव:—पुणें हौसिंग को-ऑपरेटिव्ह बँक लि.

२. बँकेची कचेरी:—केदारी बिल्डिंग, लक्ष्मी रोड, पुणें २.

३. बँकेचें कार्यक्षेत्र —बँकेचें कार्यक्षेत्र पुणें जिल्हा राहील.

४. बँकेचें ध्येय व उद्दिष्टें—बँकेचें ध्येय व उद्दिष्टें खालीलप्रमाणें आहेत:—

अ. सभासदांमध्यें परस्पर स्नेहसंबंध, सहकार व काटकसरीची भावना निर्माण करून त्यांचा परिपोष करणें.

ब. सभासदांना रहाण्याकरितां जागा मिळवून देणें व प्लॅन-एस्टिमेट तयार करून त्यांच्या खर्चानें घरें बांधून देणें. गरजेप्रमाणें त्यांच्या घराच्या दुरुस्त्या वगैरे करून देणें. अशा कामास जरूर असलेला मालमसाला खरेदी-विक्री करून त्यांचा पुरवठा करणें.

क. वरील बांधकाम व दुरुस्त्या यांस लागणारी आर्थिक मदत कर्जरूपानें स्वल्प व्याजानें उपलब्ध करून देणें व तारणावर सभासदांना कर्जें देणें.

ड. प्लॉट व घरें वगैरे स्थावर मिळकतीची सभासदांकरितां योग्य व माफक कमिशन घेऊन खरेदी-विक्री करणें.

इ. स्थावर मिळकतीची एजंट म्हणून माफक कमिशन घेऊन भाडेवसुली करणें व सर्व व्यवस्था पहाणें.

फ. बँकिंगचे सर्व व्यवहार करणें.

ग. तत्सम सर्व कामें सभासदांकरितां कमिशनवर करणें.

५. बँकेचें भांडवल—बँक खालील लिहिल्याप्रमाणें भांडवल उभारील:—

अ. भाग रूपानें भांडवल जमविणें.

ब. सर्व प्रकारच्या ठेवी घेऊन.

क. को ऑपरेटिव्ह कायद्याच्या मर्यादेंत कर्जें काढणें.

ड. मुंबई स्टेट सरकारकडून त्यांच्या योजनेप्रमाणें आर्थिक मदत मिळविणें.

इ. देणग्या स्वीकारणें.

६. भाग भांडवल—भाग रूपानें उभारलेलें भांडवल १० लाख रुपयांचें असेल.

७. भाग किंमत व संख्या—प्रत्येक भागाची किंमत शंभर रुपये असेल. असे भाग दहा हजार काढण्यांत येतील.

८. डि. सें. को-ऑपरेटिव्ह बँक, को. हाउसिंग सोसायट्या व इतर कायद्याखाली नोंदलेल्या संस्था यांना बँकेचा शेअर घेऊन बँकेचे सभासद होतां येईल.

९. बोर्ड ऑफ डायरेक्टर्स—बोर्ड ऑफ डायरेक्टर्स नऊ सभासदांचे राहील. पैकी एक मॅनेजिंग डायरेक्टर राहील. तसेंच यांपैकीं निदान २ वकील व २ इंजिनियर्स असतील.

१०. निवडणूक—साधारण सभेंत दर तीन वर्षांनीं बोर्ड ऑफ डायरेक्टर्सची निवडणूक करावी.

११. मॅनेजिंग डायरेक्टर हे पदसिद्ध बोर्डांत असतील.

१२. बोर्ड ऑफ डायरेक्टर्सवर निवडून येण्यास लागणारी पात्रता—बोर्ड ऑफ डायरेक्टर्स म्हणून निवडणुकीस उभे रहाण्याकरितां खालीं दिल्याप्रमाणें पात्रता ठरविली आहे:—

अ. किमान प्रवेशपरीक्षा पास झाला असला पाहिजे.

ब. निदान दर्शनी किंमतीचे १० शेअर्स धारण केलेले असले पाहिजेत.

टीप:—को-ऑप. बँकेचा अनुभव पांच वर्षांचा असेल तर 'अ' कलम त्यास लागणार नाहीं.

---

### गो. स. पारखे औद्योगिक मान-पारितोषिकें

मराठा चेंबर ऑफ कॉमर्स ॲण्ड इंडस्ट्रीजतर्फे प्रतिवर्षी संयुक्त महाराष्ट्रांतील कल्पक व होतकरू कारखानदारांना देण्यांत येत असलेल्या गो. स. पारखे औद्योगिक मान-पारितोषिकांसाठी १९५६ सालीं सात अर्ज चेंबरकडे आले होते. या वस्तूंचें परीक्षण करून चेंबरच्या पारितोषिक समितीनें पुढील वस्तूंबद्दल तीन पारितोषिकें देण्याची शिफारस केली आहे.

( १ ) असोसिएटेड रबर ॲंड केमिकल इंडस्ट्रीज, पुणें, यांस त्यांच्या ईक ब्ल्युसाठीं रु. १००.

( २ ) प्रतिमा प्रॉडक्टस, पुणें, यांस त्यांच्या डुप्लिकेटिंग स्टेन्सिलससाठीं रु. ७५.

( ३ ) एमेन्व्ही इंजिनियर्स, पुणें, यांस त्यांच्या ऑटोमॅटिक फ्रॅक्शन कलेक्टरसाठीं रु. ७५.

यशस्वी कारखानदारांना वरील पारितोषिकें देण्याचा समारंभ चेंबरच्या गु. प्र. ओगले सभागृहांत दि. १६ जून १९५६ रोजीं सायंकाळीं ६॥ वाजतां खासदार बॅ. रामराव देशमुख यांच्या हस्तें झाला.


दि

# बँक ऑफ महाराष्ट्र लि.

शेड्यूल्ड बँक : स्थापना १९३५

**१ जुलै १९५६ पासून स्पेशल सेव्हिंग्ज डिपॉझिट योजना सुरू होत आहे. व्याजाचा दर दोन टक्के.**

अधिक माहितीसाठी चौकशी करावी.

**अल्प मुदतीच्या ठेवी**

रु. १०,००० वरील रकमा तीन महिने व अधिक मुदतीसाठी आकर्षक व्याजाचे दरानें स्वीकारल्या जातात. व्याजाचे दरासाठी चौकशी करावी.

**इतर ठेवींवरील व्याजाचे दर**

चालू खातीं–अर्धा टक्का; सेव्हिंग्ज खाती–दीड टक्के

**मुदतीच्या ठेवी**

| मुदत | दर | मुदत | दर |
|---|---|---|---|
| १ वर्ष | अडीच टक्के | ३ वर्षें | तीन टक्के |
| २ वर्षें | पावणेतीन टक्के | ५ वर्षें | साडेतीन टक्के |

मुख्य कचेरी:– थोरले बाजीराव रस्ता, पुणें २.

चिं. वि. जोग, बी. कॉम., एफ्. आय्. बी. (लंडन) मॅनेजर.

## स्टेट बँकेचे मॅनेजिंग डायरेक्टर, श्री. हंडू, ह्यांचा राजीनामा

### पगार व भत्ता ह्यावरील टीकेचा परिणाम

स्टेट बँक ऑफ इंडियाच्या मॅनेजिंग डायरेक्टराच्या वेतनावर राज्यसभेंत ९ मे रोजीं प्रश्नोत्तरें झालीं, त्यावेळीं त्या वेतनावर बरीच टीकाहि पण झाली. "हिंदु समाज-सुधारणेप्रमाणेंच पगारांत बदल करणें सोपें जात नाहीं; येथें मुळें खोलवर रुजलेलीं असतात." असे उद्गार त्या प्रसंगीं अध्यक्ष, डॉ. राधाकृष्णन्, ह्यांनीं काढले होते. ("अर्थ": १६ मे, १९५६) वेतन कमी झालें, तरी स्टेट बँकेंत कामावर राहण्यांत जुन्या इंपीरिअल बँकेच्या वरिष्ठ अधिकारीवर्गानें जो समजूतदारपणा दाखविला, त्याची जाणीव उप-अर्थमंत्री श्री. भगत ह्यांनीं राज्यसभेंत प्रश्नाला उत्तर देतांना ठेवली नाहीं, असें बँकेचे मॅनेजिंग डायरेक्टर श्री. हंडू ह्यांस वाटत आहे. म्हणून, त्यांनीं आपल्या जागेचा राजीनामा बँकेच्या डायरेक्टर बोर्डाकडे पाठविला आहे.

स्टेट बँक स्थापन झाल्यानंतर, मॅनेजिंग डायरेक्टराचा ५०० रुपयांचा सरबराई भत्ता बंद करण्यांत आला होता. तो पुन: चालू केल्याचें उप-अर्थमंत्र्यांनीं सांगितलें. हा भत्ता दिला नसता, तर बँकेवरच सरबराईचा सर्व खर्च पडला असता व तो ५०० रुपयांच्यावर जाईल ही गोष्ट श्री. भगत ह्यांनीं स्पष्ट केली नाहीं, असें श्री. हंडू ह्यांचें म्हणणें आहे. श्री. हंडू ह्यांचा बँकेशीं ३१ वर्षांचा संबंध आहे. जुन्या जॉइंट स्टॉक बँकेचें स्टेट बँकेंत रूपांतर व्यवस्थित रीतीनें त्यांनीं घडवून आणलें होतें.

२९ जून रोजीं स्टेट बँकेच्या डायरेक्टर बोर्डाची सभा आहे. त्यांत श्री. हंडू ह्यांच्या राजीनाम्याचा विचार केला जाईल.

---

**संस्था-परामर्श**

## डेक्कन इन्स्टिटयूट ऑफ कॉमर्स

ज्या महाराष्ट्रीय विद्यार्थ्यांना प्रतिकूल परिस्थितीमुळें विश्वविद्यालयीन उच्च शिक्षण घेतां येत नाहीं अगर ज्यांना व्यापारोद्योगांत पडण्याची इच्छा असते, अशा विद्यार्थ्यांना शिक्षण देण्यासाठी प्रा. ग. कृ. भोपटकर यांनीं १९१८ सालीं स्थापन केलेली डेकन इन्स्टिटयूट ऑफ कॉमर्स, ही संस्था गेलीं ३८ वर्षे महाराष्ट्रांत व्यापारी शिक्षण देण्याचें कार्य करीत आहे. संस्था सरकारमान्य असून, जी. सी. डी.; डी. काम्.; जी. डी. सी. ॲन्ड ए.; एल्. सी. सी.; ए. सी. डब्ल्यू. ए.; शॉर्टहॅन्ड व टाईपरायटिंग, इत्यादि अभ्यासक्रमाचें शिक्षण संस्थेमार्फत दिलें जातें. वर्ग सकाळ संध्याकाळ चालत असल्यानें नोकरी करणाऱ्या विद्यार्थीवर्गाचीहि सोय झाली आहे. संस्थेंतील कार्यकर्ते सुविद्य व अनुभवी असून खेळ, त्रैमासिक, विक्रयविद्या प्रात्याक्षिक, इत्यादि उपक्रमांत संस्थेनें बरीच प्रगति केली आहे. गरीब व होतकरू विद्यार्थ्यांस संस्था फीमध्यें सवलत देते. गरीब व मध्यमवर्गीय विद्यार्थी व नोकरींत अगर व्यापारउद्दीमांत गुंतलेल्या तरूण लोकांना संस्थेंतील शिक्षणक्रम अत्यंत उपयुक्त आहे, यांत शंका नाहीं.

## सहकारी सोसायट्यांस लागू होणारे कायदे सोपे व सुटसुटीत होणार

सहकारी सोसायट्यांस लागू होणारे कायदे सोपे व सुटसुटीत करावे म्हणून मध्यवर्ती अन्न आणि शेतकीखात्याचे संयुक्त चिटणीस श्री. एस्. टी. राजा, बार-ॲट-लॉ, यांच्या अध्यक्षते खाली एक सामिति नेमण्याचें भारत सरकारनें ठरविलें आहे.

---

## CO-OPERATION & ACCOUNTANCY DIPLOMA BOARD, POONA

The following Candidates have been declared by the Co-operation and Accountancy Diploma Board to have passed the Government Diploma in Co-operation and Accountancy Examination held in April 1956, at Poona.

### I Class

Nil

### II Class

Desai M. K., Kulkarni V. P., Rathod M. O. Turmali M. B.

### Pass Class

Raje V. S., Thaker M. A., Bedekar B. N. Burhani A. F., Jetly J. T., Katkar K. G., Kurulkar V. R., Luhar K. S., Mangela R. D., Marathe P. N., Namjoshi K. A., Nehete P. C., Patel A. M., Patel K. L., Pathan M. M., Patted S. C., Shah B. C., Udavant P. L., Vasavda S. M., Desai B. A., Doshi S. D. Hegdekatti G. M., Iyengar K. T., Joshi M. P., Misal B. D., Pandya S. K., Patel M. P., Patil D. V., Saiyad M. S., Solanki R. D., Sonawane B. P., Thakar H. R., Vaidya G. L.

### Passed in Co-operation Group only

Saiyed F. K., Kale B. R., Patil R. M., Walvekar V. G.

### Passed in Accountancy Group only

Borana P. N., Potdar W. R., Athane V. S. Bhagat S. C., Chaudhari B. D., Gadekar M. F., Gharpure S. M., Gogate M. L., Kadrolli N. H., Kalasaray L. T., Kallapur K. S., Khadilkar S. P., Khakhar B. H., Mahajan S. C., Patani D. R., Patel P. N., Paranjape B. N., Pawar V. L, Phadke M. V., Sheelvant G. V., Tare S. B., Upadhyaya D. M.

**F. N. Rana.**
Registrar, Co-operative Societies, B. S., Poona,
and
Chairman, Co-operation and Accountancy
Diploma Board, Poona.


'अर्थ' ग्रन्थमाला

१ बँका आणि त्यांचे व्यवहार
२ हिंदुस्थानची रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली
४ सहकार



तमाम दंतरोगांवर
नाकडछाप म्हणजेच काळी टूथ पावडर

## नियोजन मंडळाची कार्यक्रम मूल्यमापन संघटना

### समाज विकास व राष्ट्रीय विस्तार कार्यक्रमाचा आढावा

### ( ३ )

### ग्रामसेवकाचें स्थान

ग्रामसेवकाबद्दल या अहवालांत बरीच टीका करण्यांत आली असून त्याचें योग्य स्थान कोणतें व काम कोणतें त्याची पुनः एकदां व्याख्या करावी असें सुचविण्यांत आलें आहे. ग्रामसेवकाच्या कामाबद्दल जी पहिली कल्पना होती तिच्या अनुसार ग्रामसेवक कामें करतांना आढळत नसल्यामुळें अहवालांत वरील सूचना करण्यांत आली आहे. ग्रामसेवक म्हणजे गांवकऱ्यांचा 'मित्र, मार्गदर्शक व सत्त्वज्ञ' असावा अशी पहिली कल्पना होती. त्यानें गांवकऱ्यांना अधिक चांगल्या प्रकारें प्रयत्न करण्यास व चांगलें जीवन जगण्यास प्रवृत्त करावें अशीहि अपेक्षा करण्यांत आलेली होती. शेतकींतील सुधारणांकडे त्यानें विशेष लक्ष द्यावें अशी कल्पना होती. परंतु प्रत्यक्षांत आज ग्रामसेवकाचें काम विकास योजनेगणिक पार वेगवेगळें आढळून येत आहे. तें काम परिस्थित्यनुरूप आणि त्या योजनेच्या विशिष्ट गरजेनुरूप बदललेलें दिसतें, आणि हळूहळू ग्रामसेवकाकडून अपेक्षित असलेल्या कामांत (ज्यासाठीं त्याला खास शिक्षण देण्यांत आलें) आणि प्रत्यक्ष तो करीत असलेल्या कामांत अंतर पडलें आहे.

ग्रामसेवकाचें व पंचायतीच्या कार्यवाहाचें काम एकाच व्यक्तीकडे सोपविण्याच्या अयस्वी ठरलेल्या प्रयोगाचा उल्लेख या अहवालांत करण्यांत आला असून, वरील दोन्ही जागांची कामें सर्वस्वीं भिन्न असल्यामुळे तीं एकाच व्यक्तीकडे सोपविण्यास विरोध व्यक्त करण्यांत आला आहे. तथापि या दोन्ही अधिकाऱ्यांत सहकार्य राहील असें करणें शक्य आहे. ग्रामसेवक हा पंचायतीचा पदसिद्ध सदस्य करणें हा एक मार्ग असून, सहकारी संस्थेचा त्याला पदसिद्ध संचालक नेमणें हा दुसरा मार्ग आहे. कांहीं असलें तरी शेती सुधारणेकडे लक्ष देण्याच्या त्याच्या प्रधान कार्याचा विसर पडूं नये एवढें खरें. केलेल्या कामाची काळजीपूर्वक नोंद करणें हें शेती सुधारणेच्या कामांतील प्रगतींत एक आवश्यक अंग असल्याचें अहवालांत म्हटलें आहे.

विकास कार्यक्रमाच्या विविध अंगांचा परामर्ष या अहवालांत घेण्यांत आला असला तरी शेती विस्तार कार्यावर विशेष भर देण्यांत आलेला आहे. फारसें मार्गे न लागतां शेतीच्या सुधारलेल्या पद्धतींचा वापर करीत राहण्याच्या जनतेच्या तयारीवरूनच शेती सुधारणा कामांचें यश मोजलें पाहिजे. याबाबतींत हें लक्षांत घेणें जरूर आहे कीं निश्चित व विशेष स्वरूपाचे लाभ देणाऱ्या पद्धतींचा स्वीकार शेतकऱ्यांनीं चटकन् केल्याचें आढळून आलें आहे. रासायनिक खतांचा उपयोग करणें, कंपोस्ट खत तयार करणें, चांगलें बियाणें वापरणें, नव्या प्रकारचीं अवजारें वापरणें, यासारख्या कांहीं गोष्टी वरील मुद्याच्या समर्थनार्थ देतां येतील.

### आरोग्याच्या व स्वच्छतेच्या सोयी

वैद्यकीय उपचारांची सोय करण्याबाबतचीं उद्दिष्टें बहुतेक योजनांच्या विभागांत साध्य झालीं आहेत. कांहीं ठिकाणीं तर जनतेकडून अधिक मागणी असल्यामुळें ठरल्यापेक्षां अधिक तरतूद करावी लागली. जनतेनेंहि योग्य त्या प्रमाणांत आपला वांटा उचलला.

ग्रामीण भागांतील स्वच्छतेच्या प्रश्नांचा अभ्यास करण्यासाठी संशोधनविषयक सोयींची तरतूद करण्याची गरज असल्याचें अहवालांत दिग्दर्शित्यांत आलें आहे.

समाज-शिक्षणाच्या व दळणवळणाच्या सोयींच्या प्रश्नांचा विचारहि अहवालांत करण्यांत आलेला आहे. जनतेच्या मदतीनें शाळांच्या इमारती वगैरे बांधण्यांत उल्लेखनीय यश मिळालें असलें तरी शैक्षणिक सुधारणा अंमलांत आणण्याच्या कामांतील प्रगति फारच मंद असल्याचें मत अहवालांत व्यक्त करण्यांत आलें आहे. समाज शिक्षणाच्या बाबतींतहि सर्व योजनांच्या विभागांत उल्लेखनीय प्रगति झाल्याचें नमूद करून या शिक्षणाचा महिलावर्गांत प्रसार करतांना त्यास शहरी स्वरूप देण्याच्या विरुद्ध इषारा देण्यांत आला आहे. अशा शहरी कामांच्या शिक्षणामुळें ग्रामीण महिलांना शहरी राहणी शिकविण्याचा हा प्रयत्न आहे असा, तसेंच अशी राहणी केवळ सुखवस्तु होण्यासाठी आहे, असा गैरसमज बळावेल.

मुख्य रस्त्यांना जोडणारे जोड-रस्ते ग्रामीण अर्थव्यवस्थेच्या दृष्टीनें महत्त्वाची कामगिरी बजावीत आहेत, असें मत अहवालांत नमूद करण्यांत आलें आहे व गेल्या कांहीं वर्षांत बांधण्यांत आलेल्या कच्च्या व पक्क्या रस्त्यांच्या दुरुस्तीची व्यवस्था आणखी कांहीं वर्षें या कार्यक्रमाद्वारें व्हावी व विकासोत्तर काळांत या बाबतींत लक्ष देण्याचें काम ग्रामसेवकाकडे सोपवावें असें सुचविण्यांत आलें आहे.

### सहकारी संस्था

ग्रामीण भागांत सहकारी संस्थांना असलेल्या स्थानाचा उल्लेख करतांना मुंबई राज्यांतील कोल्हापूर जिल्ह्यांत करण्यांत आलेल्या प्रयोगाचा उल्लेख अहवालांत करण्यांत आला आहे. शेतकी पतपेढीचा व सहकारी खरेदी-विक्री संस्थेचा योग्य प्रकारें संबंध जोडल्यास आणि दोहोंसाठीं योग्य त्या संघटनेची तरतूद केल्यास दोन्ही क्षेत्रांत एकदमच विकास होण्याची शक्यता, या उदाहरणावरून दिसून आली असल्याचें अहवालांत म्हटलें आहे. या बाबतींत संस्थांच्या संख्येच्या दृष्टीनें कोठेंहि विशेष प्रगति नसली तरी त्या बाबतींतील प्रगतीमुळें या चळवळीबाबत विश्वासाची भावना ग्रामीण भागांत निर्माण झाली आहे. या बाबतींतहि शिक्षित नोकरवर्गाची उणीव भासत असून ती भरून काढण्याची गरज प्रतिपादन करण्यांत आली आहे. कर्ज-पुरवठ्याच्या सोयीबाबत एक महत्त्वाची सूचना या अहवालांत करण्यांत आली आहे. निरनिराळ्या खात्यांनीं मोठमोठ्या कर्जाच्या रकमा मंजूर करण्यामुळें अनेक भागांत खूपच रकमा तुंबण्याचा प्रश्न उद्भवतो. म्हणून यापेक्षां या सर्व संबंधित यंत्रणांत एकसूत्रता राहिल्यास तें लाभदायक ठरेल असें मत अहवालांत व्यक्त करण्यांत आलें आहे.

समाज-विकास-योजनांच्या विभागांत औद्योगिक कार्यक्रम हातीं घेण्याबद्दल स्पष्ट उल्लेख करून अहवालांत असें निदर्शनास आणण्यांत आलें आहे कीं, त्या विभागाच्या व्यापक विकासाचा एक भाग म्हणूनच औद्योगिक विकासाचा उपयोग करून घेणें लाभदायक ठरेल. ग्रामोद्योगांच्या कांहीं प्रायोगिक स्वरूपाच्या योजना हातीं घेण्याची शिफारस देखील अहवालांत करण्यांत आली आहे. (समाप्त)

---

**आशिआंतील अन्नधान्याचें उत्पादन**—१९५४ सालांतील जागतिक अन्नधान्याच्या उत्पादनासंबंधीं संयुक्त-राष्ट्र-संघटनेनें अहवाल प्रसिद्ध केला आहे. त्यावरून असें दिसतें कीं, आशिआंतील देशांतून धान्याचें उत्पादन झपाट्यानें वाढत आहे. उलट, युरोप व अमेरिकेंत मात्र उत्पादन घटत असल्याचें दिसतें.

# दि रत्नाकर बँक, लिमिटेड

स्थापना—१९४३

मुख्य कचेरी :—लक्ष्मी रोड, कोल्हापूर

—शाखा—

सांगली, शाहूपुरी, मिरज, जयसिंगपूर

| | | |
|---|---|---|
| आधिकृत भांडवल | ... | रु. १०,११,००० |
| विक्री केलेलें शेअर भांडवल | ... | रु. १०,०६,६०० |
| रोख वसूल शेअर भांडवल | ... | रु. ५,०३,३०० |
| रिझर्व्ह व इतर फंड | ... | रु. १,४०,००० |
| खेळतें भांडवल (अंदाजें) | ... | रु. ५०,००,००० |

—अद्यावत् बँकिंग-व्यवहार केले जातात—

श्री. बी. बी. चौधरी, बी. ए., एलएल. बी., वकील. सांगली — चेअरमन

श्री. महादेव बाळाप्पा चौगुले कोल्हापूर — व्हा. चेअरमन

एल्. एन्. शहा, बी. कॉम, सी. ए. आय. आय. बी. मॅनेजर.

# दि सांगली बँक लि.

सांगली.

स्थापना १९१६ : शेड्यूल्ड बँक

| | | |
|---|---|---|
| वसूल भांडवल | रु. | ४,५०,००० |
| रिझर्व्हस् व इतर फंडस् | रु. | ६,२५,००० |
| एकूण खेळतें भांडवल | रु. | १,५०,००,००० |

: शाखा :

रबकवी, तेरदळ, कवठे महांकाळ, शिरहट्टी, विलिंग्डन कॉलेज, मंगळवेढा, शहापूर, उगार, इचलकरंजी, कराड, कोल्हापूर व मुंबई.

बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

मॅनेजर.

# भोर स्टेट बँक लि.

[ स्थापना : १९४४ ]

## मुख्य कचेरी:—भोर, जि. पुणें.

शाखा:—पुणें, पाली व शिरवळ.

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. | ५,००,००० |
| खपलेलें भांडवल | रु. | ५,००,००० |
| वसूल भांडवल | रु. | २,५०,००० |
| गंगाजळी व इतर फंडस् | रु. | ७७,००० |

## बोर्ड ऑफ डायरेक्टर्स

श्री. म. व्यं. शिंगरे, अध्यक्ष. — न. भू. ना. पां. थोपटे, उपाध्यक्ष.

रावसाहेब य. कृ. खोले. — श्री. चं. रा. राठी.

श्री. गो. वा. द्वेवी — श्री. बा. ग. धंडुके.

सरकारी रोखे खरेदी–विक्री, व्याजवसुली, पेन्शन कलेक्शन व इतर बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

बँक १ ते ४ वर्षे मुदतीसाठी कायम ठेवी स्वीकारते.

दराबाबत समक्ष चौकशी करावी.

पुणें कचेरी:—बुधवार घ. नं. ३६१–६२, पासोड्या विठोबानजीक. फोन नं. २५७६.

अधिक माहितीसाठी लिहा.

वाय. एस. जोशी मॅनेजर.

# दि बॉम्बे स्टेट को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड

स्थापना १९११

मुख्य कचेरी : ९, बेक हाऊस लेन, फोर्ट, मुंबई.

ह्या बँकेंत गुंतविलेला पैका शेतकरीवर्ग व सर्व प्रकारच्या सहकारी संस्था ह्यांच्याच उपयोगासाठी दिला जातो.

भरपाई झालेलें भांडवल

| | | |
|---|---|---|
| भागीदारांतर्फे | रु. | ३५,२३,७०० |
| मुंबई सरकारतर्फे | रु. | २६,००,००० |
| | रु. | ६१,२३,७०० |
| गंगाजळी व फंड | रु. | ६१,८३,९०० |
| ठेवी | रु. | १०,७९,८८,००० |
| खेळतें भांडवल | रु. | १३,२५,२४,००० |

## १४ जिल्ह्यांमध्यें ६९ शाखा

भारतांतील प्रमुख शहरीं हुंड्या, बिलें वगैरे वसुलीची व्यवस्था केली जाते. सर्व प्रकारच्या ठेवी स्वीकारल्या जातात. शर्तींबद्दल चौकशी करावी.

वा. पुं. वर्दे
ऑनररी मॅनेजिंग डायरेक्टर.


हें पत्र पुणें पेठ शिवाजीनगर घ. नं. ९१५।१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए. यांनीं 'दुर्गाधिवास' ८२१ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.